## <u>रे. दि. मु. नं.४४/२००९ मधील निशाणी क्र.१३२ वरील आदेश</u>

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र.३ आत्माराम रामचंद्र पवार यांचे कायदेशीर वारस अभिलेखावर घेणेकरीता केलेला आहे.

०२. वादी यांचे अर्जातील कथनानुसार, प्रस्तुत दाव्यातील प्रतिवादी क्र.३आत्माराम रामचंद्र पवार हे दिनांक २३.०८.२०२१ रोजी मयत झाले आहेत. प्रतिवादी यांचे वारसांना सदर दाव्याचे कामी प्रतिवादी करणे गरजेचे व न्यायाचे झाले आहे. प्रतिवादी यांना जाईबाई आत्माराम पवार, सुरेंद्र आत्माराम पवार, शुभांगी अशोक सावंत व सुनिता सुनिल मोरे हे कायदेशीर वारस आहेत. सबब, प्रतिवादी यांचे वारस अभिलेखावर घेण्यास व तशी दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेबाबत विनंती केली आहे.

०३. प्रतिवादी यांनी आपले म्हणणे देवून सदरचा अर्ज खर्चासह मंजुर करणेबाबत कथन केले आहे.

०४. प्रस्तूत अर्ज, त्यावरील शपथपत्र व म्हणणे वाचले. वादी व प्रतिवादी यांचे विधीज्ञांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरुध्द प्रतिवादीने दावा मिळकती वादीच्या वारस हक्काच्या व मालकी वहिवाटीच्या आहेत असे जाहीर होवून मिळणेकरिता तसेच ताकिदीसाठी दाखल केला आहे. वादी यांनी प्रतिवादी आत्माराम रामचंद्र पवार यांचे मृत्यू प्रमाणपत्राची मुळ प्रत नि.१३५ वर दाखल केली आहे. सदर मृत्यू उता-याचे अवलोकन केले असता, प्रतिवादी यांचा मृत्यू दिनांक २३.०८.२०२१ रोजी झालेचे दिसून येत आहे. प्रस्तुत दाव्याच्या स्वरुपाचा विचार करता दाव्यामध्ये सर्व आवश्यक पक्षकार सामील करुन घेणे गरजेचे आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, आदेश २२ क्रम ४ चा विचार करता जर प्रतिवादी याचा मृत्यू झाला तर त्याचे वारसांच्या विरुध्द दावा करण्याचा अधिकार वादीला टिकून राहिला तर प्रतिवादीच्या कायदेशीर वारसांना पक्षकार करणे गरजेचे आहे. प्रस्तुत दाव्याचे स्वरुप पाहता दावा मिळकतीबाबत प्रतिवादीचे वारसांविरुध्द दावा करण्याचा अधिकार वादीला आहे, असे दिसून येत आहे. प्रस्तुतचा अर्जात कथन केलेप्रमाणे जाईबाई आत्माराम पवार, सुरेंद्र आत्माराम पवार, शुभांगी अशोक सावंत व सुनिता सुनिल मोरे हे प्रतिवादी क्र.३ यांचे वारस असलेबाबत प्रथमदर्शनी दिसून येत आहे. प्रस्तुतचा दावा गुणदोषांवर निकाली काढण्यासाठी कायदेशीर वारसांना वादी म्हणून सामील करुन घेणे न्यायोचित दिसून येत आहे. जाईबाई आत्माराम पवार, सुरेंद्र आत्माराम पवार, शुभांगी अशोक सावंत व सुनिता सुनिल मोरे यांना मागणी केलेप्रमाणे प्रतिवादी क्र.३अ, ३ब, ३क व ३ड म्हणून सामील करुन घेणे न्यायोचित दिसून येत आहे. सबब, अर्ज नामंजूर झाल्यास यातील वादी व प्रतिवादी तसेच न्यायालयाच्या वेळेचा अपव्यव होणार आहे. यासर्व बाबींचा विचार करता मी खालीलप्रमाणे

आदेश पारीत करीत आहे.

## **आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी अर्जात नमुद केलेप्रमाणे मयत प्रतिवादी क्र.३ आत्माराम रामचंद्र पवार यांचे वारस त्यांच्या योग्य ती नांवे व वयांसह अभिलेखावर घेवून तशी दुरुस्ती १४ दिवसांचे आत करावी. तसेच, दुरुस्त दाव्याची प्रत व आवश्यक प्रती तात्काळ सादर कराव्यात.

Digitally signed by Chetna Yashwant Neware
Date: 2022.06.22 17:14:43 +0530

पाटण. (सी.वाय.नेवारे)

दिनांकः २१.०६.२०२२ सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटण.